**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/०९/२०२४

दिनांक - २४.०२.२०२५

**प्रति,**

१. दिगंबर गोपाळ सावंत

२. लक्ष्मण गोपाळ सावंत

दोघे रा. माडग्याळ, ता.जत जि.सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. संदिपान गोपाळ सावंत मयत वारस

१/१. बाळकृष्ण संदिपान सावंत

१/२.शिवाजी संदिपान सावंत

१/३.गजानन संदिपान सावंत

१/४.तानुबाई संदिपान सावंत

१/५.निलाबाई महादेव यादव

२. सोपान गोपाळ सावंत

अ.क्र.१/१ ते १/४ रा.जालीहाळ बु, ता.जत जि.सांगली

अ.क्र.१/५ रा.घोळसंगी ता.विजयपूर कर्नाटक

अ.क्र.२ रा.माडग्याळ ता.जत जि.सांगली ---- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे. माडग्याळ, ता. जत, जि. सांगली येथील गट/सर्व्हे नंबर ४३९८ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, माडग्याळ यांनी फेरफार क्रमांक ४३९८, प्रकरणी दिले निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे. माडग्याळ, ता. जत, जि. सांगली येथील गट/सर्व्हे नंबर ४३९८ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, माडग्याळ यांनी फेरफार क्रमांक ४३९८, प्रकरणी दिले निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

२. वादातीत फेरफाराचे अवलोकन करता गट नंबर १०७० यांस कै.संदिपान गोपाळ सावंत हे दिनांक ०४.११.२००१ रोजी मयत झालेनंतर त्यांचे वारस जाबदार १/१ ते १/५ यांचे वारसा नोंद झालेली आहे. अपिलार्थी यांचे संपूर्ण अपिल अर्जाचे अवलोकन करता वारसां बाबत म्हणजेच चुकीच वारस दाखल केले आहेत अथवा वगळून वारसा नोंद केली आहे असे त्यांचे म्हणणे नाही. वास्तविक हिंदू वारसा कायद्यानुसार एखादा व्यक्ती मयत झाला असल्यास कलम ८ प्रमाणे त्यांचे वारसां नोंद करणे आवश्यक आहे. त्यामुळे

वादातीत फेरफाराची नोंद मंजूर करणेचा मंडळ अधिकारी यांचा निर्णय योग्य व कायदेशीर आहे.

३. अपिलार्थी यांचे म्हणण्यान्वये वाद मिळकतीचे वाटपपत्र लिहून ठेवले होते त्यानुसार जाबदार १/१ ते १/५ यांचे पुर्वहक्कदार कै.संदिपान यांना भिवर्गी येथील जमीन वाटपाने दिल्याने त्यांना मौजे माडग्याळ येथील वाद मिळकत गट नंबर १०७० यासी त्यांचा काही संबध येत नाही. त्यामुळे वादातीत फेरफारची नोंद रद्द करून मागत आहेत. वास्तविक अपिलार्थी यांनी वाटपपत्रानुसार गट नंबर १०७० ही मिळत त्यांना प्राप्त झालेली आहे याचे कोणतेही कायदेशीर पुरावे सादर केलेले नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांचा मुद्दा गैरलागू ठरतो. मुलत: अपिलार्थी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अवलोकन करता या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेरील म्हणजेच दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रातील मुद्दे उपस्थित करून झालेले वादाचा फेरफार रद्द करणेची विनंती करीत आहेत. मुलत: अपिलार्थी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने याबाबत जरूर तर सक्षम दिवाणी न्यायालयामध्ये याबाबत दाद मागणे क्रमप्राप्त होणार आहे.

४. अपिलार्थी यांना अपील दाखल करणेस ३ महिने २३ दिवस इतका विलंब का ? झालेला आहे. याबाबत कोणताही कायदेशीर ऊहापोह अथवा कागदोपत्री पुरावा माझे-समोर आणीत नाहीत. त्याचबरोबर मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी देणेत आलेल्या वेगवेगळया आदेश प्रकरणी प्रत्येक दिवसागणीक विलंबाबातची कारणे पुराव्यानिशी नमूद करणे क्रमप्राप्त असताना अशी कोणतीही बाब कारण-मिमांसासहीत माझे निदर्शनास आणीत नाहीत. त्यामुळे वरील सर्व उपरोक्त वस्तुस्थीती व दाखल कागदपत्रे यांचा एकत्रीत अवलोकन करता अपिलार्थी यांचे दाखल अपील हे कायदेशीरदृष्टया या न्यायालयात टिकणार नसलेचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचा प्रस्तुत अपील अर्ज हा विलंब माफीच्या मुद्दयावरच फेटाळणे आवश्यक असलेबाबतचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**निकालपत्रातील नमुद कारणास्तव प्रस्तुत अपिलार्थी यांचा अपील अर्ज विलंब माफीच्या मुद्दयावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणेतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

**( अजयकुमार नष्टे )**
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -२४.०२.२०२५

प्रत -तहसिलदार जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.